L-1 H 2381

भारत सरकार

**विधि व न्याय मंत्रालय**

सत्यमेव जयते

# राज्यपाल (वित्तलब्धी, भत्ते व विशेषाधिकार) अधिनियम, १९८२

## (सन १९८२ चा अधिनियम क्रमांक ४३)

[ रोजी यथाविद्यमान]

# The Governors (Emoluments, Allowances and Privileges) Act, 1982

(Act No. 43 of 1982)

[As in force on the ]

*

महाराष्ट्र राज्याच्या भाषा संचालनालयाद्वारे अनुवादित आणि संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.

**२०१७**

[**किंमत :** रुपये]

# राज्यपाल (वित्तलब्धी, भत्ते व विशेषाधिकार) अधिनियम, १९८२

कलमांचा क्रम

कलमे

१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ
२. व्याख्या
३. वित्तलब्धी
४. रजा भत्ता
५. पदीय निवासस्थानांचा वापर आणि परिरक्षण
६. गृहकार्य आस्थापना
७. वैद्यकीय उपचार
८. प्रवासभत्ता
९. पद ग्रहण करताना किंवा रिक्त करताना प्रवासभत्ता
१०. पदीय निवासस्थानातील सामानसुमानांचे नुतनीकरण करण्याकरिता आणि त्याचे परिरक्षण करण्याकरिता भत्ते
११. इतर विशेषाधिकार व भत्ते
१२. अतिरिक्त खर्च
१३. नियम करण्याचा अधिकार
१४. विधीग्राह्यीकरण
१५. व्यावृत्ती.

# राज्यपाल (वितलब्धी, भत्ते व विशेषाधिकार) अधिनियम, १९८२

(१९८२ चा अधिनियम क्रमांक ४३)

[ रोजी यथाविद्यमान]

[दिनांक २८ ऑगस्ट १९८२]

राज्यपालांची वित्तलब्धी, भत्ते व विशेषाधिकार यांचे निर्धारण करण्यासाठी अधिनियम, भारतीय गणराज्याच्या तेहतिसाव्या वर्षी संसदेद्वारे तो पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

**१.** (१) या अधिनियमास, राज्यपाल (वित्तलब्धी, भत्ते व विशेषाधिकार) अधिनियम, १९८२ असे म्हणावे. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

(२) तो जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून संपूर्ण भारतभर लागू असेल.

(३) तो केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

**२.** या अधिनियमामध्ये अन्यथा दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,— व्याख्या.

(क) “ राज्यपाल ” याचा अर्थ, कोणत्याही राज्याचा किंवा दोन किंवा अधिक राज्यांचा राज्यपाल किंवा राज्यपालांचे कर्तव्ये पार पाडणारी व्यक्ती, असा आहे ;

(ख) “ परिरक्षण ” यात,—

(एक) **अधिकृत निवासस्थानांच्या** संबंधात, वीज, गॅस व पाणी या तरतुदींसह ;

(दोन) मोटार वाहनांच्या संबंधात, शोफरचे वेतन व भत्ते आणि तेल, पेट्रोल व इतर इंधन या तरतुदींसह ;

(ग) एखाद्या राज्यपालाच्या संबंधात, “ कुटुंबातील सदस्य ” याचा अर्थ राज्यपालाचा [१][पती किंवा पत्नी, अवलंबित मुले आणि अवलंबित मातापिता], असा आहे.

(घ) एखाद्या राज्यपालाच्या संबंधात “ अधिकृत निवासस्थाने ” याचा अर्थ, राज्यपालाची अधिकृत निवासस्थाने म्हणून राष्ट्रपतीने **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, अशी निवासस्थाने, असा आहे आणि यात, कर्मचारी वसाहत आणि त्याला संलग्न असलेल्या इतर इमारती आणि त्याचे उद्यान यांचा सामावेश होतो ;

(ङ) “ नियम ” याचा अर्थ, या अधिनियमाअन्वये करण्यात आलेले नियम, असा आहे ;

(च) “ राज्य ” यामध्ये, संघ राज्यक्षेत्राचा समावेश होत नाही.

**३.** प्रत्येक राज्यपालाला [२][प्रति महिना एक लाख दहा हजार रुपये] इतक्या दराने वित्तलब्धी देण्यात येईल : वित्तलब्धी.

परंतु असे की, जर एखादा राज्यपाल, त्याच्या नियुक्तीच्या वेळी,—

(क) भारत सरकारच्या किंवा त्याच्या कोणत्याही पूर्वाधिकारी सरकारच्या अंतर्गत किंवा राज्य शासनाच्या किंवा त्याच्या कोणत्याही पूर्वाधिकारी सरकारच्या अंतर्गत कोणत्याही पूर्वीच्या सेवेच्या संबंधात, निवृत्तिवेतन प्राप्त करीत असेल तर, (विकलांगता किंवा जखमी निवृत्तिवेतनाव्यतिरिक्त) त्याची वित्तलब्धी पुढीलप्रमाणे कमी करण्यात येईल,—

(एक) त्या निवृत्तिवेतनाच्या रकमेइतकी ; आणि

(दोन) अशा नियुक्तीपूर्वी जर अशा पूर्वीच्या सेवेच्या संबंधात, त्यास देय असलेल्या निवृत्तिवेतनाच्या भागाऐवजी त्यास एखादी रक्कम मिळत असेल तर, निवृत्तिवेतनाच्या त्या भागाच्या रकमेइतके त्याचे अंशराशीकृत मूल्य; [३][किंवा]

[४] * * * * * * * * * * *

---

[१] सन २००९ चा अधिनियम क्रमांक १, कलम २ द्वारे दाखल करण्यात आला (१ जानेवारी २००७ रोजी व तेव्हापासून).

[२] सन २००९ चा अधिनियम क्रमांक १, कलम ३ द्वारे दाखल करण्यात आला (१ जानेवारी १९९६ रोजी व तेव्हापासून).

[३] सन १९९४ चा अधिनियम क्रमांक १, कलम २ द्वारे दाखल करण्यात आला (१ जून १९८८ रोजी व तेव्हापासून).

[४] वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे वगळण्यात आला (१ जून १९८८ रोजी व तेव्हापासून).

(ख) अंशदायी भविष्यनिर्वाह निधीच्या रूपाने कोणताही लाभ प्राप्त करीत असले तर, त्याच्या वित्तलब्धी, अशा लाभाच्या समतुल्य निवृत्तिवेतनाइतकी कमी करण्यात येईल.

रजा भत्ता.

**४.** (१) या बाबतीत करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांना अधीन राहून, राष्ट्रपती त्यास योग्य वाटेल अशी रजा राज्यपालास मंजूर करील.

(२) जेव्हा राष्ट्रपतीकडून राज्यपालाची रजा मंजूर करण्यात आली असेल तेव्हा, त्यास, राष्ट्रपती आदेशाद्वारे निर्धारित करील अशा दराने रजा भत्ता देण्यात येईल :

परंतु असे की, राज्यपाल, कलम ३ च्या परंतुकाअन्वये, वित्तलब्धी कमी करण्यास पात्र असेल अशा प्रमाणात, असा रजा भत्ता कमी करण्यात येईल.

पदीय निवासस्थानांचा वापर आणि परिरक्षण.

**५.** राज्यपाल, आपल्या संपूर्ण पदावधीमध्ये, भाडेपट्ट्याचे प्रदान न करता, आपल्या अधिकृत निवासस्थानांचा वापर करण्यास हक्कदार असेल आणि अशी निवासस्थाने सुसज्ज करण्यासंबंधात किंवा त्यांचे परिरक्षण करण्यासंबंधात व्यक्तीशः राज्यपालावर कोणताही भार पडणार नाही.

गृहकार्य आस्थापना.

**६.** या बाबतीत करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांना अधीन राहून, राज्यपालासाठी तरतूद करण्यात आलेल्या गृहकार्य आस्थापनेच्या सदस्यांना द्यावयाचे वेतन, भत्ते किंवा निवृत्तिवेतन किंवा इतर वित्तलब्धी किंवा पुरविण्यात आलेल्या सुविधा यांच्यासंबंधात व्यक्तीशः राज्यपालावर कोणताही भार पडणार नाही.

वैद्यकीय उपचार.

**७.** या बाबतीत करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांना अधीन राहून, राज्यपालाला किंवा त्याच्या कुटुंबातील सदस्यांना त्याच्या पदावधीमध्ये व त्यानंतर देखील केंद्र सरकारद्वारे किंवा कोणत्याही राज्य शासनाद्वारे चालविल्या जाणाऱ्या रुग्णालयांमध्ये **मोफत वैद्यकीय परिचर्या,** निवासव्यवस्था व उपचार मिळण्याचा हक्क असेल.

प्रवासभत्ता.

**८.** (१) राज्यपाल, राष्ट्रपतीने आदेशाद्वारे निश्चित केलेली अशी मोटार वाहने, भाड्याने किंवा किरायाचे प्रदान न करता, वापरण्यास हक्कदार असेल.

(२) पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या मोटार वाहनांच्या परिरक्षणाच्या संबंधात व्यक्तीशः राज्यपालावर कोणताही भार पडणार नाही.

(३) राज्यपालाच्या कुटुंबातील सदस्यांकडून पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या मोटार वाहनांचा वापर, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमांद्वारे विनियमित करण्यात येईल.

पद ग्रहण करताना किंवा रिक्त करताना प्रवासभत्ता.

**९.** या बाबतीत करण्यात आलेल्या नियमांना अधीन राहून, राज्यपाल—

(क) तो सामान्यपणे रहात असलेल्या ठिकाणापासून त्याच्या कामाच्या ठिकाणापर्यंत पद ग्रहण करण्याकरिता केलेल्या प्रवासाच्या संबंधात; आणि

(ख) पद सोडल्यानंतर त्याच्या कामाच्या ठिकाणापासून जेथे तो त्यानंतर सामान्यपणे राहतो त्या ठिकाणापर्यंत किंवा असे पद सोडून दिल्यानंतर शासनाच्या अधीनस्थ असलेले अन्य कोणतेही पद (इतर राज्याच्या राज्यपालाच्या पदासह) तो ग्रहण करीत असेल तर, अशा इतर पदाच्या संबंधात कामाच्या ठिकाणापर्यंतच्या प्रवासाच्या संबंधात, स्वतः आणि त्याच्या कुटुंबातील सदस्यांच्या आणि त्यांच्या किंवा त्यांच्या कुटुंबातील सदस्याच्या चीजवस्तूंच्या वाहतुकीकरिता प्रवास भत्त्यास मिळण्यास हक्कदार असतील.

पदीय निवासस्थानातील सामानसुमानांचे नूतनीकरण करण्याकरिता आणि त्याचे परिरक्षण करण्याकरिता भत्ते.

**१०.** या बाबतीत करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांना अधीन राहून, राज्यपाल अधिकृत निवासस्थानातील सामानसुमानांचे नूतनीकरण करण्याकरिता आणि त्याचे परिरक्षण करण्याकरिता राष्ट्रपती आदेशाद्वारे निश्चित करील अशा भत्त्यांस हक्कदार असेल.

**११.** राज्यपालास आपल्या पदाची कर्तव्ये सोईस्करपणे आणि प्रतिष्ठेने पार पाडता यावीत या प्रयोजनासाठी, तो— इतर विशेषाधिकार व भत्ते.

(एक) या बाबतीत करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित केलेल्या अशा इतर विशेषाधिकारांना हक्कदार असेल, आणि

(दोन) या बाबतीत करण्यात आलेल्या नियमांना अधीन राहून, राष्ट्रपती सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे निश्चित करील अशी रक्कम पुढील मार्गाने देईल :—

(क) करमणूक भत्ता;

(ख) आतिथ्य अनुदान;

(ग) गृहकार्य आस्थापना खर्च;

(घ) इतर खर्च;

(ङ) कंत्राट भत्ता, म्हणजेच संकीर्ण खर्चाकरिता भत्ता;

(च) पर्यटन खर्च; आणि

(छ) नियमांद्वारे तरतूद करण्यात आली असेल असे इतर भत्ते किंवा खर्च.

**१२.** (१) कोणत्याही राज्यपालाच्या बाबतीत, राष्ट्रपतीची खात्री पटली असेल की, कोणत्याही भत्त्यांच्या स्वरूपात किंवा कोणत्याही बाबीच्या संबंधात, कोणताही खर्च भागविण्यासाठी या अधिनियमान्वये प्राधिकृत केलेल्या रकमेमध्ये वाढ करणे आवश्यक आहे किंवा या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमांमध्ये ज्या कोणत्याही बाबीसाठी अनुज्ञेय असली तरी, तरतूद करण्यात आली नसेल त्या संबंधात, खर्च मंजूर करण्याची गरज उदभवली आहे, त्यास अशा आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा प्रमाणात विशेष आदेशाद्वारे अशी रक्कम वाढविता येईल किंवा असे खर्च मंजूर करता येतील. अतिरिक्त खर्च.

(२) पोट-कलम (१) अन्वये, भूतलक्षी प्रभावाने एखादा आदेश काढता येईल.

(३) या कलमान्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश हा होईल तितक्या लवकर, संसदेच्या दोन्ही सभागृहांसमोर ठेवण्यात येईल.

**१३.** (१) राष्ट्रपतीस, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या प्रयोजनासाठी, नियम करता येतील. नियम करण्याचा अधिकार.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबींकरिता असे नियम करता येतील :—

(क) कलम ४ अन्वये, राज्यपालाला रजा मंजूर करणे;

(ख) कलम ६ अन्वये, राज्यपालासाठी तरतूद करण्यात आलेल्या गृहकार्य आस्थापनेशी संबंधित बाबी;

(ग) कलम ७ अन्वये, राज्यपालासाठी व त्याच्या कुटुंबातील सदस्यांसाठी वैद्यकीय परिचर्या, निवासव्यवस्था व उपचार;

(घ) कलम ८ च्या पोटकलम (३) अन्वये, राज्यपालाच्या कुटुंबातील सदस्यांसाठी मोटार वाहनांचा वापर;

(ङ) कलम ९ अन्वये, राज्यपालाचे पद ग्रहण करताना किंवा रिक्त करताना प्रवास भत्ता;

(च) कलम १० अन्वये, अधिकृत निवासस्थानांच्या सामानसुमानांचे नूतनीकरण व परिरक्षण करण्याकरिता भत्ते;

(छ) कलम ११ अन्वये, राज्यपालास हक्कदार असलेले विशेषाधिकार आणि राज्यपालास देय असलेले भत्ते किंवा खर्च.

(३) या अधिनियमान्वये राष्ट्रपतीने केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवला जाईल आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणतेही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर, तो नियम अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल, किंवा, यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही; तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमान्वये करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

विधीग्राह्यीकरण. **१४.** (१) या अधिनियमांच्या प्रारंभापूर्वी, कोणत्याही राज्यपालाचे (नागालॅण्डच्या राज्यपालाव्यतिरिक्त) भत्ते, खर्च (वैद्यकीय खर्चासह) किंवा विशेषाधिकार यासंबंधात राष्ट्रपतीकडून काढण्यात आलेला प्रत्येक विशेष आदेश, असा आदेश भूतलक्षी प्रभावाने काढण्यात आला असला तरी किंवा त्या बाबींच्या संबंधात कोणत्याही कायद्यान्वये काढण्यात आलेल्या कोणत्याही सर्वसाधारण आदेशाशी विसंगत असला तरी, असा विशेष आदेश हा, या पोट-कलमाचा भाग होता आणि हे पोट-कलम सर्व महत्वाच्या वेळी लागू करण्यात आले होते असे समजून वैध आणि परिणामक असेल.

(२) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी नागालॅण्डचे राज्यपाल यांचे भत्ते, खर्च (वैद्यकीय खर्चासह) किंवा विशेषाधिकार यासंबंधात राष्ट्रपतीकडून काढण्यात आलेला प्रत्येक सर्वसाधारण किंवा विशेष आदेश, असा आदेश भूतलक्षी प्रभावाने काढण्यात आला असला तरी असा आदेश हा या पोट-कलमाचा भाग होता आणि हे पोट-कलम सर्व महत्त्वाच्या वेळी लागू करण्यात आले होते असे समजून वैध आणि परिणामक असेल.

व्यावृत्ती. **१५.** या अधिनियमामधील किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमांमधील कोणत्याही गोष्टी, कोणत्याही राज्यपालाच्या वित्तलब्धी व भत्ते त्याच्या पदावधीमध्ये घटविता यावे यासाठी लागू होणार नाहीत.

**ANNEXURE**

## GLOSSARY

**1. The Governors (Emoluments, Allowances and Privileges) Act, 1982.**

**(43 of 1982)**

**राज्यपाल (वित्तलब्धी, भत्ते व विशेषाधिकार) अधिनियम, १९८२**

| English Term (1) | Reference (2) | Marathi Equivalent Suggested (3) | Marathi Equivalent Approved (4) |
|---|---|---|---|
| Maintenance | Sec. 2(b) | परिरक्षण | परिरक्षण |
| Official residence | Sec. 2(b)(1) | पदीय निवासस्थान | अधिकृत निवासस्थान |
| Spouse | Sec. 2(c) | विवाहसाथी | पती किंवा पत्नी |
| Commuted value | Sec. 3(a)(2) | अंशराशीकृत मूल्य | अंशराशीकृत मूल्य |
| Household establishment | Sec. 6 M.H. | घरगुती आस्थापना | गृहकार्य आस्थापना |
| Free medical attendance | Sec. 7 | मोफत वैद्यकीय परिचर्या | मोफत वैद्यकीय परिचर्या |
| effects | Sec. 9 | चीजवस्तू | चीजवस्तू |
| Assumption of office | Sec. 9 | पद ग्रहण करणे | पद ग्रहण करणे |
| Hospitality grants | Sec. 11(ii)(b) | आतिथ्य अनुदान | आतिथ्य अनुदान |

**The Governors (Emoluments, Allowances and Privileges) Act, 1982.**

**(43 of 1982)**

**राज्यपाल (वित्तलब्धी, भत्ते व विशेषाधिकार) अधिनियम, १९८२**

**इंग्रजी - मराठी शब्दसूची**

| | | |
|---|---|---|
| Official residence | अधिकृत निवासस्थान | Sec. 2(b)(1) |
| Hospitality grants | आतिथ्य अनुदान | Sec. 11(ii)(b) |
| Commuted value | अंशराशीकृत मूल्य | Sec. 3(a)(2) |
| Household establishment | गृहकार्य आस्थापना | Sec. 6 M.H. |
| effects | चीजवस्तू | Sec. 9 |
| Assumption of office | पद ग्रहण करणे | Sec. 9 |
| Maintenance | परिरक्षण | Sec. 2(b) |
| Free medical attendance | मोफत वैद्यकीय परिचर्या | Sec. 7 |
| Spouse | पती किंवा पत्नी | Sec. 2(c) |

शासकी मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई